नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/०६/२०२५ (रविवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत घेण्यात आला रूटमार्च, दंगा काबु योजना ,शांतता समितीची बैठक तसेच गोरक्षकाची बैठक

आगामी बकरी ईद सणोत्सव असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकामी नागपुर ग्रामीण जिल्हयात नागपुर विभागातील खालील पोलीस स्टेशनला श्री दिपक अग्रवाल,सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांच्या उपस्थितीत रूटमार्च, दंगा काबु योजना,शांतता समितीची बैठक तसेच गोरक्षकाची बैठक घेण्यात आल्या.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— दिनांक २९/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे श्री दिपक अग्रवाल,सहा.पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांच्या उपस्थितीत शांतता समितीच्या सदस्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीत हजर सदस्यांना योग्य मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या.

दिनांक ३०/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे श्री दिपक अग्रवाल,सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांच्या उपस्थितीत एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोरक्षकांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत पोलीस दलातर्फे गोरक्षांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच योग्य सुचना देण्यात आल्या

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक ३१/०५/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथे श्री दिपक अग्रवाल,सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांच्या उपस्थितीत बोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोरक्षकांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत पोलीस दलातर्फे गोरक्षांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच योग्य सुचना देण्यात आल्या

दिनांक ०१/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन बोरी येथे श्री दिपक अग्रवाल,सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,नागपुर विभाग यांच्या उपस्थितीत बोरी पोलीस स्टेशनचे अधिकारी अंमलदार यांच्यासह आर.सी.पी. पथक यांनी रूट

मार्च काढला. सदर रूटमार्च बुटीबोरी गावात घेण्यात आला.रूट मार्च नंतर दंगा काबु योजना सुध्दा घेण्यात आली.










महाराष्ट्र पोलीस




## <u>सावनेर येथे वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद.</u>
## ४ पिडीतांची सुटका , ४.आरोपी अटक

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक ३१/०५/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, सावनेर परीसरातील हेटी रोडवर असलेल्या ओयो हॉटेलमध्ये एका अल्पवयीन मुलीकडुन देहव्यापार करवुन घेत आहे. अशी माहीती मिळाल्याने सावनेर पोलीसांनी जुन्या पांढुर्णा रोडवरील **ओयो हॉटेल गॅलेक्सी इन लॉजिंग अॅड रेस्टॉरंट** येथे धाड टाकली असता **आरोपी क्रं १ हॉटेल मालक नामे सुरज पिलाजी मिलमिले, वय २८ वर्षे,रा सातनुर ता.सौसर जि पांढुर्णा राज्य मध्यप्रदेश हा मिळुन आला.** हॉटेलच्या खोल्यांची तपासणी केली असता ३ पिडीत महीला आणि १ अल्पवयीन मुलगी मुलगी मिळुन आल्या. तसेच **आरोपी क्र. २. नामे अमित कोठीराम आवारी, वय २१ वर्षे, रा. सातनुर, ता सौसंर, जि. पांढुर्णा,**

**मध्यप्रदेश, आरोपी क्र. ३.श्रेय दिलीप जुनोनकर, वय २० वर्षे, रा. संतोषी माता वार्ड, एम.पी ग्राउंड ता.जि. पांढुर्णा, मध्यप्रदेश, आरोपी क्र. ४. शकील शरीफ शेख, वय २८ वर्षे, रा.संगम सावंगा,ता.सौसर, जि.पांढुर्णा मध्यप्रदेश तसेच एक विधीसंघर्ष ग्रस्त बालक मिळुन आले.** पोलीसांनी हॉटेलच्या नोंदणी रजिस्टर ची पाहणी केली असता त्यात कोणत्याही नोंदी मिळुन आल्या नाही. पिडीत महीलांची विचारपुस केली असता आरोपी क्रं १ हा स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता मुलींना/महीलांना पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन त्यांच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याचे निष्पन्न झाले.तसेच आरोपी क्रं १ याने अल्पवयीन मुलीचे वयाची खात्री न करता स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी रूम उपलब्ध करून दिल्याचे समजले.

. **नमुद आरोपी क्रं १. हॉटेल मालक नामे सुरज पिलाजी मिलमिले, वय २८ वर्षे,रा सातनुर ता.सौसर जि पांढुर्णा , आरोपी क्र. २. नामे अमित कोठीराम आवारी, वय २१ वर्षे, रा. सातनुर ता सौसंर जि. पांढुर्णा, मध्यप्रदेश, आरोपी क्र. ३. श्रेय दिलीप जुनोनकर, वय २० वर्षे, रा.संतोषी माता वार्ड, एम.पी ग्राउंड ता.जि.पांढुर्णा मध्यप्रदेश आरोपी क्र ४.शकील शरीफ शेख, वय २८ वर्षे, रा.संगम सावंगा,ता.सौसर जि.पांढुर्णा मध्यप्रदेश आणि विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांच्या विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३, ४,५,६,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सह कलम १४३ (१)(एफ),१४३ (४), ६५(१) भा.न्या.सं सह कलम ४,१७,१८ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करून ३ पिडीत महिला तसेच एका अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पोलीसांनी नमुद आरोपी क्रं १ ते ४ यांना अटक केली आहे.**




**जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद**
**३ जनावरांची सुटका,२ आरोपी अटक**
**भिवापुर पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन भिवापुर** :—दिनांक ३१/०५/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की बोलोरो पिकअप एम एच ४० सी.टी २९२५ मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पेट्रोलींग करून सदर वाहनाचा शोध घेतला असता भिवापुर वरून नागतरोली च्या दिशेने नमुद वाहन भरधाव वेगाने जाताना दिसले.पोलीसांनी शिताफिने पाठलाग करून सदर वाहन नागतरोली गावाचे रोडवर थांबविले. **वाहनाची** पाहणी केली असता त्यामध्ये ३ गोवंश जनावरे दिसुन आले. नमुद जनावरांना चारपाण्याची कोणतीही सोय न करता, निर्दयते कोंबुन जनावरांची वाहतुक केली जात असल्याचे दिसुन आले. वाहनामध्ये चालकासह क्लिनर मिळुन आला. त्यांना त्यांची नाव पत्ता विचारले असता आरोपी क्रं १) **चालक नामे कुंदन गब्बर गोयल, वय २३ वर्ष,** आरोपी क्रं २) **क्लिनर नामे अमोल अरूण घोडेस्वार दोघेही रा. निष्ठी, ता. पवनी जि. भंडारा** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. सदर आरोपीतांना वाहन मालकाबाबत विचारणा केली असता

आरोपी क्रं ३)**वाहन मालक नामे कालीदास कोठीराम देव्हारे रा. सागर बार जवळ, भिवापुर असे सांगितले.** आरोपीतांना जनावारांबाबत विचारपुस केली असता नमुद जनावरे **आरोपी क्रं ४) ईसम नामे समीर रा. भिवापुर** याच्या मालकीची असल्याचे सांगितले.तसेच त्याच्याच सांगण्यावरून जनावरांची अवैध रित्या वाहतुक करीत असल्याचे सांगितले.पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक बोलोरो पिकअप एम एच ४० सी.टी २९२५ किंमती ५,००,०००/— रूपये. व ३ गोवंश जनावरे किंमती २१,००० /— रूपयाचा एकुण किंमती ५,२१,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

**वर नमुद आरोपीतांच्या विरूध्द भा.न्या.सं, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, महा. पशु संरक्षण अधिनियम,मोटर वाहन अधिनियम, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.आरोपी क्रं. १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.**

## लैगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. देवलापार** :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन देवलापार येथे १७०/२०२१ कलम ३७६(२) (एन) (एफ) (एल) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत अशा प्रकारे आहे की, २०/०८/२०२१ चे २०/१०/२०२१ च्या दरम्यान यातील पिडीत मुलगी ही गाई चारण्याकरीता **आरोपी नामे बंडु फुलचंद उईके, वय ५५ वर्षे, रा. वडंबा ता. रामटेक** याचे सोबत जंगल परिसरात गेली असता आरोपीने पिडीत मुलगी ही बुध्दीने कमजोर (कमी समज) असल्याचा गैरफायदा घेवुन पिडीता सोबत वारंवार जबरदस्तीने शारीरीक संबंध प्रस्थापीत केले, अशा फिर्यादिच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद.

**पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मी घोडगे** यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपीविरूध्द दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात **मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रं ६ श्रीमती एच.सी. शेंडे** यांनी दिनांक ३१/०५/२०२५ रोजी आरोपी नामे बंडु फुलचंद उईके वय ५५ वर्ष रा. वडंबा ता. रामटेक यास **सदर गुन्हयात ३७६(२)(एन),(एफ),(एल) भादवी मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व १५,०००/— रू. दंड , दंड न भरल्यास ३ महीने साधा कारावास. अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने एपीपी **श्री श्याम खुळे** यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा **/ १९९० इमरान शेख पो. स्टे. देवलापार** यांनी मदत केली आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने